मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 25 जून 2025 | पान- 1

# पवना धरणात 50 टक्के जलसाठा

## पिंपरी-चिंचवड शहरवासियांना दिलासा; सहा महिन्याची पाण्याची चिंता मिटली

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ सह परिसरात गेल्या महिनाभरापासून मावळ तालुक्यासह पवन मावळ परिसरात मुसळधार पाऊस बरसत आहे. गेल्या महिन्याभरापासून पडत असलेल्या पावसाचा जोर आज दिवसभर मोठ्या प्रमाणात होता. त्यामुळे पवना धरणाच्या पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे.



आज दिवसभरात पाऊस थांबला नाही परिसरात या पाऊसामुळे भात खाचरे, ओढे, नाले तुडुंब भरून वाहत आहेत. धरण परिसरातील मुसळधार पावसामुळे डोंगरावरील धबधबे वाहू लागले आहेत.

पिंपरी-चिंचवडसह मावळवासियांची तहान भागविणा-या पवना धरणात ५१.३४ टक्के इतका पाणीसाठा झाला आहे. पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस होत असल्याने धरणातील पाणीसाठ्यात घसघशीत वाढ होत आहे. आज दिवसभरात २६ मिमी पाऊस झाला आहे. दुपारी ४ च्या आकडेवारी नुसार धरणात ५१.३४ टक्के ईतका पाणीसाठा आहे.

१ जूनपासून धरण क्षेत्रात ६०७.१६ मिली मीटर पावसाची नोंद झाली असून मागील वर्षी आजमितीला धरणात १९ टक्के पाणीसाठा होता. व धरण परिसरात जोरदार पाऊस सुरुचं आहे. अशी माहिती पवना धरण शाखा अभियंता रजनीश भारिया यांनी दिली.

## पाकिस्तानला मदत करणाऱ्या देशांच्या उत्पादनांवर बंदी घाला

### भाजपची मागणी; शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचे आयुक्तांना पत्र



**पिंपरी | प्रतिनिधी**

पुलवामा हल्ल्यानंतर पाकिस्तानशी सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, पाकिस्तानला अप्रत्यक्ष किंवा प्रत्यक्ष मदत करणाऱ्या तुर्की, अझरबैजान आणि चीन या देशांच्या उत्पादनांवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात बंदी घालण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांना यासंदर्भात एक लेखी पत्र दिले आहे. महापालिकेच्या विविध विकासकामांमध्ये आणि इतर सरकारी कामांमध्ये या देशांच्या उत्पादनांचा वापर तातडीने थांबवण्यात यावा, अशी मागणी काटे यांनी पत्राद्वारे केली आहे.

शत्रुघ्न काटे यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, "पुलवामा हल्ल्यानंतर पाकिस्तानबरोबर झालेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर देशातील जनतेच्या भावना अत्यंत तीव्र आहेत. पाकिस्तानला पाठिंबा देणाऱ्या तुर्की, अझरबैजान आणि चीन या देशांच्या उत्पादनांवर बंदी घालण्याचे सरकार आणि समाजातील विविध घटकांकडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष निर्देश आहेत. या तीव्र भावना लक्षात घेता, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व सरकारी कामांमध्ये, विशेषतः महापालिका क्षेत्रातील विविध विकास प्रकल्पांमध्ये आणि इतर कामांमध्ये तुर्की, अझरबैजान आणि चीनमधील कंपन्यांची उत्पादने वापरली जाऊ नयेत, अशी मागणी त्यांनी केली आहे. या मागणीची दखल न घेतल्यास गंभीर परिणामांचा इशाराही काटे दिला आहे.

"या देशांतील कंपन्यांच्या उत्पादनांचा वापर महापालिकेकडून केला जात असल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल आणि त्याविषयी आंदोलन व अन्य मार्गाने अशी कामे न होण्याबाबत आम्ही योग्य ती भूमिका घेऊ," असे काटे यांनी पत्रात म्हटले आहे. त्याचबरोबर, आयुक्तांनी महापालिकेच्या सर्व विभागांना या संदर्भात तातडीने सूचना द्याव्यात आणि विकास प्रकल्पांमध्ये व अन्य कामांमध्ये या देशांतील उत्पादने वापरली जाणार नाहीत याची खबरदारी घेतली जाईल, याची खात्री करावी, अशी विनंतीही काटे यांनी केली आहे.



# पुणे जिल्ह्यात 42 अपघातप्रवण ठिकाणे

## रस्ते अपघातातील मृत्यू कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याची सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यात ४२ अपघातप्रवण ठिकाणे असून, रस्ते अपघातातील मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी जिल्ह्यात रस्ते सुरक्षा विषयक आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात आणि अपघातप्रवण (ब्लॅकस्पॉट) संदर्भात जनजागृती करावी, अशी सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे. जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी झाली. त्यावेळी त्यांनी ही सूचना केली.



सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाप्पा बहीर, कार्यकारी अभियंता मिलिंद बारभाई, प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांच्यासह भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पोलीस, प्रादेशिक परिवहन विभागासह पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

जिल्ह्यात पुणे महानगरपालिका हद्दीत १५, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये २२, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ दोन, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या हद्दीत एक आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत दोन असे एकूण ४२ ब्लॅकस्पॉट आहेत. रस्ते सुरक्षिततेच्यादृष्टीने या ठिकाणी अल्प तसेच दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात, असे डुडी यांनी सांगितले.

अपघात प्रवण ठिकाणी जाण्यास प्रतिबंध किंवा ठराविक कालावधीसाठी निर्बंध घालावेत. या ठिकाणी दिशादर्शक फलकांची उभारणी, राडारोडा साफ करणे, बॅरिकेटींग आदी उपाययोजना कराव्यात. या उपाययोजनांची पोलीस प्रशासन आणि प्रादेशिक परिवहन विभागाने तपासणी करुन येत्या एक महिन्यात अहवाल सादर करावा, असे डुडी यांनी सांगितले. गेल्या एक वर्षात जिल्ह्यात झालेल्या अपक्षातांची ठिकाणनिहाय कारणे शोधावीत. या अनुषंगाने सर्व संबंधित विभागाला सुरक्षात्मक उपायोजना करण्यात याव्यात. तसेच खडकवासला धरण परिसरातील वाहतूक कोंडी टाळण्याकरीता वाहतूक पोलिसांची नियुक्ती करावी. रस्ते सुरक्षा जनजागृतीकरीता निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असेही डुडी यांनी स्पष्ट केले.

# क्षेत्रीय कार्यालयांत किरकोळ तक्रारींकडेही दुर्लक्ष

## महापालिका आयुक्तांची कबुली, काम न करणाऱ्यांवर देखरेखीची यंत्रणाच नसल्याचे वक्तव्य

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील विविध भागांत राहणाऱ्या नागरिकांचे प्रश्न त्यांच्याच स्तरावर सुटावेत, यासाठी महापालिकेची यंत्रणा क्षेत्रीय कार्यालयांपर्यंत विकेंद्रित करण्यात आली. मात्र, क्षेत्रीय कार्यालय स्तरावरील अधिकारी, कर्मचारी काम करीत नसल्यामुळे नागरिकांच्या किरकोळ तक्रारीदेखील सुटत नाहीत. त्यामुळे नागरिक तक्रारी घेऊन महापालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये येत असल्याची कबुली महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सोमवारी दिली.




‘महापालिकेतील कर्मचारी, अधिकाऱ्यांमध्ये काम करण्याचा उत्साह दिसत नसल्याने येणाऱ्या काळात अधिक काम करण्याचा प्रयत्न राहणार आहे. पालिकेची यंत्रणा नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी पारदर्शक केली जाणार आहे,’ असे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सोमवारी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले. आयुक्त म्हणून काम करताना सध्या महापालिकेतील विविध विभागांकडून घेतल्या जात असलेल्या आढाव्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

महापालिका आयुक्त म्हणाले, ‘महापालिकेत आल्यापासून गेल्या आठवडाभरात दररोज किमान एक हजार नागरिकांना भेटलो. क्षेत्रीय कार्यालय स्तरावर नागरिकांचे प्रश्न सुटत नसल्याने बहुतांश नागरिक महापालिकेच्या मुख्य इमारतीमधील कार्यालयात येतात, ही वस्तुस्थिती आहे. या तक्रारी खालच्या पातळीवर सुटणे अपेक्षित आहे. क्षेत्रीय कार्यालयांच्या सहायक आयुक्तांना मोठ्या प्रमाणात अधिकार आहेत. मात्र, ते का वापरत नाहीत? हा प्रश्न आहे. महापालिका कर्मचाऱ्यांची काम करण्याची यंत्रणा जुनी आहे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी नागरिकांचे प्रश्न सोडविण्यावर भर दिला, तर पालिकेत येणाऱ्यांची तक्रारदारांची संख्या आपोआपच कमी होईल. अनेक कामे निधीअभावी होत नसल्याचा आरोप केला जातो. त्यावरदेखील विचार केला जात असून, पुढील काळात आवश्यक त्या निधीची तरतूद केली जाईल.’

‘सध्या काही ठरावीक लोकच काम करत आहेत, त्यामुळे इतरांकडेही लक्ष दिले जाणार आहे. काम न करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्याची सध्या कोणतीही यंत्रणा नाही. मात्र, आता पालिकेच्या कारभारात सुधारणा करून जास्तीत जास्त कारभार ऑनलाईन पद्धतीने करण्यासाठी प्राधान्य राहणार आहे,’ असे नवल किशोर राम म्हणाले.

**‘यंत्रणेत बदल करणे आवश्यक’**

‘महापालिकेत वर्षानुवर्षे जुन्याच पद्धतीने कामे केली जात आहेत. राज्यातील इतर महापालिकांनी ऑनलाईन पद्धतीचा वापर करून सर्व विभाग एकमेकांशी जोडलेले आहेत. पुणे महापालिकेत ही उणीव जाणवते. महापालिकेच्या कारभारात सुसूत्रता यावी, यासाठी पालिकेतील सर्व विभाग ऑनलाईन जोडले जाणार आहेत. यातून काम न करणाऱ्या लोकांचा शोध घेता येईल आणि कामात पारदर्शकता आणता येईल. यासाठी सध्या महापालिकेच्या वतीने शहरात सुरू असलेल्या प्रकल्पांची यादी तयार केली जाणार आहे. त्यामधून किती काम पूर्ण झाले आहे, याचा आढावा घेणे सोपे जाईल. सध्या शहरात ३५ प्रकल्पांचे काम सुरू असून, या प्रकल्पांना गती दिली जाणार आहे,’ असे आयुक्त म्हणाले.

### ‘कर्मचारी भरपूर; पण रस्त्यावर दिसत नाही’

**» ‘शहरातील रस्ते आणि परिसर स्वच्छ करण्यासाठी १२ हजार कर्मचारी काम करीत असल्याचे सांगितले जाते. मात्र, प्रत्यक्षात यातील अनेक कर्मचारी रस्त्यावर कधीच दिसत नाही. प्रत्येक पाचशे मीटर अंतरावर कर्मचारी काम करताना दिसणे आपेक्षित आहे. मात्र, ते दिसत नाही. घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्याचे काम स्वच्छ संस्थेमार्फत केले जाते. यासाठी तीन हजार कर्मचारी आहेत. झोपडपट्टी भागातील कचरा उचलला जात नाही. त्यामुळे रस्त्यावर कचऱ्याचे ढीग साचतात. कामात पारदर्शकता दिसत नाही. महापालिका यंत्रणा यामध्ये कुठे कमी पडते, याचा अभ्यास केला जाणार आहे,’ आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.**

# एकट्या राहणाऱ्या ज्येष्ठांकरिता 'ज्येष्ठानुबंध ॲप'

## ज्येष्ठांच्या मदतीसाठी या ॲपच्या माध्यमातून पोलीस 24 तास उपलब्ध राहणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील एकट्या राहणाऱ्या वृद्धांकरिता पोलिसांनी 'ज्येष्ठानुबंध' ॲप विकसित केले आहे. अशा ज्येष्ठांच्या मदतीसाठी या ॲपच्या माध्यमातून पोलीस २४ तास उपलब्ध राहणार असून, त्यांच्याशी संवाद साधणे, प्रसंगी किराणा माल, औषधे आणून देणे, तसेच नुसता संवाद करणे अशीही मदत करण्यात येणार आहे.

'ज्येष्ठांचा सन्मान, पोलिसांचा मान' या संकल्पनेतून पिंपरी-चिंचवड पोलिसांनी हे विशेष ॲप सुरू केले आहे. वयोवृद्धांच्या गरजा लक्षात घेऊन, त्यांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी सोडविण्यासाठी ही सेवा सुरू करण्यात आली आहे.




'परदेशात किंवा दूरच्या शहरात स्थायिक झालेल्या शहरातील तरुणांच्या वृद्ध आई-वडिलांना वय वाढल्याने दैनंदिन जीवनात अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. शरीर साथ देत नाही. आजारपणात कोणी जवळ नसते. किराणा, औषधे घ्यायला कोणी सोबत नसते. संवादाचाही अभाव जाणवतो. हळूहळू हे पालक मानसिकदृष्ट्या एकटे पडू लागतात. घर आहे, पण आपली माणसे नाहीत; मोबाइल आहे, पण फोन येत नाहीत. त्यामुळे त्यांच्यात एकटेपणाची जाणीव अधिक तीव्र होते. त्यासाठी हे ॲप सुरू केले आहे,' असे पोलिसांनी सांगितले.

"ज्येष्ठानुबंध' ॲपची माहिती स्थानिक पोलिसांनी आपल्या हद्दीतील ज्येष्ठ नागरिकांशी संपर्क साधून दिली असून, आतापर्यंत २५ हजार ज्येष्ठ नागरिकांनी यावर नोंदणी केली आहे. ही सेवा २४ तास विनामूल्य उपलब्ध आहे,' असे पोलीस निरीक्षक दिगंबर सूर्यवंशी यांनी सांगितले.

ॲपमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी त्यांच्या परिसरातील रुग्णालयांची नावे, रुग्णवाहिका सेवा आणि तातडीच्या मदतीसाठी लागणारे संपर्क क्रमांक उपलब्ध आहेत. त्यामुळे संकटाच्या वेळेस सहज मदत मिळू शकेल. या ॲपमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी केलेल्या विनंत्यांचे विश्लेषण करून त्यांच्या गरजांनुसार त्वरित आणि अचूक सेवा देता येणार आहे.

### स्वतंत्र कक्ष करणार मदत

» 'ज्येष्ठानुबंध' उपक्रमासाठी पोलीस आयुक्तालयात एक स्वतंत्र कक्ष स्थापन केला आहे. अनुभवी पोलीस अंमलदार आणि अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. ज्येष्ठ नागरिकांच्या गरजा, तक्रारी आणि विनंत्यांवर तत्काळ प्रतिसाद देणे, हे त्यांचे मुख्य काम असणार आहे. ज्यांना औषध, किराणा आणण्यासाठी जाता येत नाही, त्यांना पोलीस साहित्य आणून देणार आहेत. वरिष्ठ अधिकारी कक्षाच्या कामकाजाचा दररोज आढावा घेणार आहेत.

> ज्येष्ठ नागरिकांसाठी उपयुक्त सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून वेळेवर मदत पोहोचवणे हा 'ज्येष्ठानुबंध' ॲपचा मुख्य उद्देश आहे.
>
> – विनयकुमार चौबे,पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड.

# मेट्रो स्थानकांसाठी 162 झाडे तोडण्याचा प्रस्ताव

## 162 झाडे तोडण्यासाठी महामेट्रो प्रशासनाने महापालिकेच्या उद्यान विभागाकडे प्रस्ताव सादर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी ते निगडी या मेट्रो मार्गिकेसाठी १७ झाडे तोडल्यानंतर आता चार मेट्रो स्थानकांना अडथळा ठरणारी १६२ झाडे तोडण्याची परवानगी मागणारा प्रस्ताव महामेट्रोने महापालिकेच्या उद्यान विभागाला सादर केला आहे.

शहरात पिंपरी ते दापोडी या साडेसात किलोमीटर मार्गावर मेट्रो धावत आहे. पिंपरी, संत तुकारामनगर, नाशिक फाटा, कासारवाडी, फुगेवाडी आणि दापोडी ही सहा मेट्रो स्थानके आहेत. आता दुसऱ्या टप्प्यात पिंपरी ते निगडीच्या भक्ती-शक्ती समूह शिल्प चौकापर्यंत ४.५ किलोमीटर अंतर मेट्रो मार्ग विस्ताराचे काम सुरू आहे. त्यासाठी ९१० कोटी १८ लाखांचा खर्च आहे. या मार्गावर चिंचवड स्टेशन, आकुर्डीतील खंडोबा माळ चौक, निगडीतील टिळक चौक आणि भक्ती-शक्ती समूह शिल्प अशी चार स्थानके आहेत. ती उभारण्यासाठी अडथळा ठरणारी चिंचवड स्टेशनसह या मार्गावरील १६२ झाडे तोडण्यासाठी महामेट्रो प्रशासनाने महापालिकेच्या उद्यान विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे.




> मेट्रो स्थानकाला अडथळा ठरणारी १६२ झाडे तोडण्यासाठी परवानगी द्यावी, असा प्रस्ताव मेट्रोकडून आला आहे. त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. वृक्षसंवर्धन समितीच्या पुढील बैठकीत याबाबत निर्णय होईल. एखादे झाड २० वर्षांचे असेल, तर त्या बदल्यात २० झाडांची लागवड मेट्रो प्रशासनाकडून करून घेण्यात येणार आहे.
>
> – उमेश ढाकणे, सहायक आयुक्त, उद्यान विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका.

> पिंपरी ते निगडी ही मेट्रो मार्गिका आणि स्थानकांसाठी झाडे तोडणे योग्य नाही. यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. मेट्रोने झाडे न तोडता काम करावे.
>
> – सचिन काळभोर, सामाजिक कार्यकर्ते.

> मेट्रो मार्गिका आणि स्थानकासाठी अडथळा ठरणारी झाडे हटविण्यात येणार आहेत. त्यासाठी महापालिकेकडे परवानगीसाठी अर्ज केला आहे. काही झाडांचे पुनर्रोपण केले जाणार आहे.
>
> – हेमंत सोनवणे, संचालक, महामेट्रो.

# पुणे रेल्वे स्थानकाच्या नामांतरावरून वाद

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाकडून क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले यांच्या नावाची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्रातील मोदी सरकारनं महत्त्वाच्या शहराच्या नामांतराचा धडाका लावल्यानंतर महायुती सरकारनेही औरंगाबाद, उस्मानाबाद, अहमदनगर या तीन जिल्ह्यांचे नामांतर केले. याच पार्श्वभूमीवर पुणे रेल्वे स्थानकाला श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांनी केली. मात्र, यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात ठिणगी पडली.

दरम्यान, इतिहास अभ्यासक श्रीमंत कोकाटे यांनी पुणे रेल्वे स्थानकाला राजमाता जिजाऊंचे नाव देण्यात यावे, अशी मागणी केली. तर, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाकडून क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले यांच्या नावाची मागणी केली जात आहे.




मेधा कुलकर्णी म्हणाल्या की, "पुणे हे शैक्षणिक आणि आयटी हब मानले जाते. इतके महत्त्वाचे शहर असूनही स्थानकाची सध्याची परिस्थिती खूपच दयनीय आहे, ते सुधारले पाहिजे. राजधानी एक्सप्रेस देखील पुण्यातून जोडली पाहिजे, दिल्ली ते हैदराबाद एक्सप्रेस असो किंवा बेंगळुरू ते दिल्ली एक्सप्रेस, ती पुण्यातूनच गेली पाहिजे. नाशिक आणि बदलापूर सारख्या शहरांमध्ये जास्त कनेक्टिव्हिटी नाही. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी पुण्याहून नाशिकला जाणारी कोणतीही ट्रेन नाही. शिवाय, पुणे स्थानकाचे नाव श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या नावावर ठेवले पाहिजे, ज्यांनी इतकी युद्धे लढली आहेत आणि एकही युद्ध गमावले नाही. अशा महान योद्ध्याचे नाव या रेल्वे स्थानकाला दिले पाहिजे."

पुणे रेल्वे स्थानकाला राजमाता जिजाऊ यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी करताना श्रीमंत कोकाटे यांनी म्हटले आहे की, "मेधा कुलकर्णी यांनी पुणे स्टेशनला थोरले बाजीराव पेशवे यांचे नाव घेण्याची केलेली मागणी अत्यंत चुकीची आणि निराधार आहे. पुणे शहराची स्थापना राजमाता जिजाऊ यांनी केली आहे. त्यांनीच पुणे शहर वसवले. त्यांनी जर हे केले नसते तर पुण्याची निर्मिती झाली असती का? पेशवे वगैरे शौर्य गाजवू शकले असते का? आपण लढू शकतो, जिंकू शकतो आणि उत्तम प्रकारे राज्य चालू शकतो ही भावना राजमाता जिजाऊ यांनीच निर्माण केली. त्यामुळे पुणे स्टेशनला राजमाता जिजाऊ यांचेच नाव दिले पाहिजे. मेधा कुलकर्णी यांनी मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास केला पाहिजे", असेही ते म्हणाले.

### स्टेशनला महात्मा फुलेंचे नाव द्या : सचिन खरात

» "पुणे रेल्वे स्टेशनला क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांचे नाव दिले पाहिजे अशी आपली पूर्वीपासूनची मागणी आहे. पुणे हे जगामध्ये विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते ते कुणामुळे? महात्मा फुले यांनी ती ओळख निर्माण केली. पुण्याला, महाराष्ट्राला आणि देशाला अभिमान वाटावा असंच क्रांतिकारी काम महात्मा फुले यांनी केले आहे. त्यामुळे पुणे रेल्वे स्थानकाला महात्मा फुले यांचे नाव दिले पाहिजे", अशी मागणी संभाजी ब्रिगेडने केली. याचबरोबर पुणे रेल्वे स्थानकाला क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांचेच नाव द्यावे अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे नेते सचिन खरात यांनी केली.

# राजगड, तोरणा, मढेघाट, धरण परिसर 30 सप्टेंबर बंद

## 30 सप्टेंबर पर्यंत पर्यटनाला मनाई : उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

राजगड तालुक्यात होणाऱ्या अतिवृष्टी व नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांचे आकर्षण असलेल्या तालुक्यातील किल्ले तोरणा, राजगड , तसेच पानशेत, वरसगाव, गुंजवणी धरण परिसर, मढे घाट धबधबा तसेच महत्त्वाच्या ठिकाणी तसेच रविवारी (ता.२२) पासून ३० सप्टेंबर पर्यंत पर्यटनाला प्रशासनाने मनाई केली असल्याचा आदेश भोरचे उपविभागीय अधिकारी डॉ. विकास खरात दिले आहेत.

पर्यटन बंदीचे आदेश 22 जून रोजी दुपारी जाहीर झाल्यानंतर प्रशासनाची धावपळ उडाली. यामुळे सुट्टीचा दिवस असलेल्या रविवारी गडावर व संबंधित पर्यटन स्थळावर गेलेल्या पर्यटकांना नाराज होऊन परतावे लागले.



पावसाळा सुरू झाले की पर्यटकांना वेध लागतात ते राजगड , तोरणा, लिंगाणा किल्ल्याच्या ट्रेकिंगसह गुंजवणी, पानशेत, वरसगाव, धरणासह तालुक्यातील छोट्या-मोठ्या धबधब्यांच्या ठिकाणी वर्षाविहार करण्यासाठी. मात्र तालुक्यात मोठ्या प्रमाणात होणारी पर्जन्यवृष्टी व डोंगर भागातील निर्माण होणारे धुके गडावर निर्माण पावसाळ्यात होणाऱ्या निसरड्या वाटा, घाटमाथ्यावरील असणारे अरुंद रस्ते तसेच त्या परिसरात कोसळणाऱ्या दरडी यामुळे दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नसून या पार्श्वभूमीवर तालुक्यातील पर्यटन स्थळांवर प्रतिबंध करणे,मढेघाट परिसरात रॅपलिंगला बंदी घालण्यात आली असल्याचे आदेशात म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर, पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी, उपविभागीय अधिकारी डॉ. विकास खरात यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ आणि भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३, कलम १६३ अंतर्गत राजगड तालुक्यातील पर्यटनस्थळांवर २२ जून २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

किल्ले तोरणा, राजगड व मढेघाट गुंजवणी पानशेत वरसगाव परिसरामध्ये पर्यटनास मनाई असा फलक पुरातत्व खात्याचे पाहरेकरी बापु साबळे,पवन साखरे, आकाश कचरे, विशाल पिलावरे गडाच्या पायथ्याला पाल खुर्द येथे पाहरा देत होते. या वेळी आपत्ती व्यवस्थापन पथकाचे सदस्य तसेच वनविभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

### आदेशातील बंदी असलेले महत्त्वाचे मुद्दे बुलेट मध्ये

» पावसामुळे वेगाने वाहणाऱ्या पाण्यात उतरणे व पोहणे

» धबधब्याच्या वर जाणे अथवा पाण्याच्या प्रवाहात खाली बसणे.

» पावसामुळे धोकादायक झालेल्या ठिकाणांवर सेल्फी काढणे अथवा कोणत्याही प्रकारची चित्रीकरण करणे.

» वाहतुकीचे रस्ते तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबवणे.

» नैसर्गिक ठिकाणी मद्यपान करणे, मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतूक करणे, अनधिकृत मद्यविक्री करणे, उघड्यावर मद्य सेवन करणे.

» सार्वजनिक ठिकाणी खाद्यपदार्थ काचेच्या व प्लॅस्टिकच्या बाटल्या थर्माकोल व इतर प्लास्टिकचे साहित्य इतरत्र फेकणे.